# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथे नविन उपप्रादेशिक, परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(१) ८५०० (०७-०४-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथे नविन उपप्रादेशिक, परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव हे जिल्हयातील मध्यवर्ती तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी केंद्र व राज्य शासनाची बरीच कार्यालये आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगांव, शेगांव, नांदुरा, जळगांव, जामोद, संग्रामपूर या गावांतील नागरिकांना सुध्दा बुलढाणा येथे पासिंग करीता जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावातील नागरिकांच्या हालपेष्टा थांबविण्यासाठी खामगांव येथे नविन उपप्रादेशिक कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) हे खरे नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा यांच्यामार्फत खामगांव येथे २ दिवस, शेगांव, नांदुरा व जळगांव येथे प्रत्येकी १ दिवस असे पासिंगचे काम करण्याकरिता कॅम्प घेण्यात येतात.

(४) परिवहन कार्यालयांचे विभाजन करुन नविन परिवहन कार्यालय निर्माण करण्यासाठी परिवहन आयुक्तांनी निश्चित केलेल्या निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांच्या शेती मालाला योग्य हमी भाव मिळणेबाबत**

**(२) ५८५३८ (२२-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमी भाव नसणे आणि शेतीमाल विकत घेणाऱ्या व्यापाऱ्यांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापाऱ्यांवर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे सर्व व्यापारी संगनमत करुन शेतीमाल अत्यंत कवडीमोल भावात विकत घेऊन साठेबाजी करुन परत तोच माल बाजारात जास्त भावात विकतात ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही व महागाईवरही नियंत्रण राहील याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक ६ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

पणन विभागाकडून प्राप्त माहितीनूसार पणन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे घाऊक शेतमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार बाजार समितीच्या आवारात जाहीर लिलावाद्वारे होतात. अशा लिलावमध्ये सहभागी होणारे व्यापारी जाहीर लिलावाद्वारे जास्तीत जास्त बोली लावून शेतमालाची खरेदी करतात. त्यामुहे व्यापाऱ्यांमध्ये स्पर्धा निर्माण होऊप शेतमालाला जास्तीत जास्त भाव मिळण्यास मदत होते. तसेच ज्या शेतमालाची किमान आधारभूत किंमत केंद्र शासनाकडून जाहीर केली जाते. अशा शेतमलालाचे व्यवहार किमान आधारभूत किंमतीवर करणे व्यापाऱ्यांवर बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी किंमतीवर खरेदी झाल्यास असे व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांचा परवाना बाजार समिती रद्द करु शकते. अशा प्रकारे व्यापाऱ्यांवर शासनाचे नियंत्रण आहे.

किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. शेतमालाला किमान हमी भाव वाजवी मिळावेत म्हणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.

(३) व (४) मा.आ.श्री.राहुल मोटे यांचे शेतीमालाला हमीभाव मिळणेबाबत या विषयाचे दि. ६/६/२०१६ चे निवेदन प्राप्त झाले असून त्याअनुषंगाने त्यांना मा.मंत्री (कृषी) यांच्या स्वाक्षरीने कृषी विभागासंदर्भातील मुद्यांबाबतची माहिती मा.वि.स.स. यांना कळविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील क्षारपड जमिनींबाबत**

**(३) ६६६५८ (१७-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सुमारे ३,१६४ हेक्टर क्षेत्र क्षारपड व ६२३८ हेक्टर क्षारपड होण्याच्या मार्गावर आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यातील क्षारपड जमिनीचा प्रश्न निकाली काढण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०४-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
विविध कालावधीत झालेल्या सर्वेक्षणानुसार ३१७८ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे.
(२) जमीन सुधारणा करणेसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना (R.K.V.Y.) अंतर्गत कामे चालू आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाची दूरवस्था सुधारण्याबाबत

**(४) ६६८७८ (२७-०१-२०१७). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आजमितीस परिवहन महामंडळाकडे जनता बसेस १७०४९, निमआराम बसेस ९५३, वातानुकुलीत बसेस ११ तर व्हॉल्वो स्कॅनिया, मर्सिडिज यांची संख्या २५ आहे याशिवाय मागीय पाच वर्षात एकूण ४२०९ बसेस निकामी झाल्या असुन त्यांच्या जागी खरेदी केलेल्या नवीन बसेसची कुठेच नोंद नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानव विकास विभागाने आठवी ते बारावीपर्यतच्या शिक्षण घेणाऱ्या दुर्गम भागातील मुलीसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक पाच बसेस देण्यात आल्या असुन या बसेस चालवितांना काही अटी मानव विकास विभागाने टाकल्या असुन त्या अटींचे पालन एस.टी महामंडळ करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एस.टी महामंडळाची दूरवस्था सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०६-२०१७) :**(१) राज्य परिवहन महामंडळाकडून आर्थिक वर्ष सन २०११-१२ ते डिसेंबर, २०१६ अखेर एकूण ८२३३ वाहने मोडित काढण्यात येवून, नवीन १०,७८५ वाहने महामंडळाच्या ताफ्यात जमा झालेली आहेत.
(२) व (३) दिनांक १९.०७.२०११ च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थीनींच्या वाहतूक सुविधेव्यतिरिक्त इतर वेळेत मानव विकास बसेसचा वापर प्रवासी सुविधेकरिता राज्य परिवहन महामंडळ करु शकेल असे नमूद असल्याने शालेय वेळे व्यतिरिक्त इतर वेळेत सदर बसेसचा वापर प्रवासी सुविधेकरिता केला जातो. विद्यार्थीनींसाठी मानव विकासच्या बसेसचा वापर

करण्यात येतो. तसेच ज्या मार्गावर मानव विकास अंतर्गत बसेस वाहतूक नाही, त्या मार्गावर साध्या बसेसद्वारेदेखील वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येवून वाहतूक सुविधेअभावी कोणतीही विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"शेतकरी स्वाभिमान वर्ष" या योजनेसाठी निधी देण्याबाबत**

**(५) ६७१११ (०९-०१-२०१७). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सन २०१६-१७ हे वर्ष "शेतकरी स्वाभिमान वर्ष" म्हणून मा.वित्तमंत्री यांनी जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी स्वाभिमान वर्ष म्हणून नेहमीच्या योजना वगळता इतर कोणत्या नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपुर्ण योजना या वर्षात राबविण्यात आल्या आहेत तसेच या नाविन्यपूर्ण व वैशिष्टपूण योजनेसाठी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या योजनांसाठी केलेली आर्थिक तरतूद व आतापर्यंत झालेल्या प्रतिपुर्तीची नेमकी सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३१-०४-२०१७) :**(१) होय
(२) सन २०१६-१७ वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना शासनाने खालील नवीन १००% राज्य योजना घोषित केल्या आहेत.

१) कृषि महोत्सव योजना
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना
३) पंडीत दीनदयाळ उपाध्याय कृषि मार्गदर्शक योजना
४) कृषि गुरुकुल योजना
५) राज्य कृषि व अन्न प्रक्रिया योजना
६) सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र

सन २०१६-१७ या चालू आर्थीक वर्षात प्रस्तावित १००% राज्य योजनांसाठी नियोजन विभागाने एकूण रु.१५० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करून दिला आहे.
(३) प्रस्तुत योजना पैकी कृषि महोत्सव योजना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन नवीन राज्य राबविण्यास दि.३.१.२०१७ रोजी मंत्री मंडळाने मान्यता दिली आहे. कृषि महोत्सव योजना या योजनेसाठी लेखाशिर्ष उघडणे, निधी निधी उपलब्ध करुन घेण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सद्यस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या योजनेची अंमलबजावणी पुर्णपणे शक्य होणार नसल्याने सन २०१६-१७ मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत मंजूर निधीतून सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याव्यतीरिक्त पंडीत दीनदयाळ उपाध्याय कृषि मार्गदर्शक व कृषि गुरुकुल योजना दोन नवीन योजना स्वतंत्रपणे न राबविता सदर दोन योजनामधील प्रस्तावित कार्यक्रम आत्मा या

केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राबविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच राज्य कृषि व अन्न प्रक्रिया योजना व सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र या नवीन योजनांचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत या योजनांसाठी करण्यात आलेल्या तरतुदी खर्च करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन अनुदान न मिळालेबाबत**

**(६) ६७६२२ (१६-१२-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना गेली दोन वर्षे दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागत असून दुष्काळावर मात करण्यासाठी ठिबक सुक्ष्म सिंचन हे प्रभावी साधन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये ठिंबक सिंचन संच बसवलेल्या कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे तब्बल चार कोटी अनुदान थकित आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांनी अनुदानाची रक्कम मिळणेबाबत वारंवार जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कोल्हापूर यांना वेळोवेळी निवेदने दिली आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांनी अनुदानाची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०६-२०१७) :**(१) होय.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील रु.३.२६ कोटी एवढ्या रकमेच्या अनुदानाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(३) होय.

(४) प्रलंबित अनुदान देण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यास रु.३.२६ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीच्या वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषि विभागात अ, ब, क आणि ड या चार संवर्गातील मिळून**
**तब्बल ७४११ जागा रिक्त असल्याबाबत**

**(७) ६९००३ (१६-१२-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि विभागात अ, ब, क आणि ड या चार संवर्गातील मिळून तब्बल ७४११ जागा रिक्त असून, यामध्ये १५०८ जागा पदोन्नती अभावी रिक्त आहेत, तसेच निवृत्त झालेल्या व आजारी रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या ८ हजाराहून अधिक जागा भरल्या गेल्या नसल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी संचालकांच्या ५ पैकी ४ जागा तसेच कृषी सहसंचालकांच्या १४ पैकी ५ जागा रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ७४११ पैकी ५९०३ जागा सरळसेवेने भरावयाच्या आहेत, परंतु त्यासाठी भरती प्रक्रियाच सुरु करण्यात आलेली नाही हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अधीक्षक कृषी पर्यवेक्षक कृषी सहाय्यक आरेखक अनुरेखक, माळी अशी महत्वाची पदे रिक्त असल्यामुळे शासनाच्या नवीन योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवीणे शक्य होत नसल्याने आगामी काळात सर्व प्रकारची रिक्त पदे तातडीने भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०६-०४-२०१७) :**(१) हे अशंत: खरे आहे.

कृषि विभागामध्ये माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर एकूण २७५०२ मंजूर आहेत. त्यापैकी १९७८७ पदे भरलेली व ७७१५ पदे रिक्त आहेत.

(२) दिनांक १ जानेवारी, २०१६ ते १७ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत संचालक संवर्गातील ४ अधिकारी व दि. ३१ ऑगस्ट, २०१४ ते १७ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत कृषि सहसंचालक संवर्गातील ५ अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने पदे रिक्त आहेत.

(३) अशंत: खरे आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील ५० रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांच्या नुकत्याच मुलाखती घेण्यात आल्या असून पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे. उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतची मागणीपत्रं महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही तातडीने सुरु आहे.

(४) पदोन्नतीच्या कोटयातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनाच्या प्रचलीत नियमांच्या तरतुदीनुसार करण्यात येत आहे. कृषि पर्यवेक्षकांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा प्रस्तावित असून सेवाप्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येईल. दिनांक २९/१२/२०१५ रोजी दिलेल्या जाहिरातीतील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच कृषि सहाय्यकांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यासाठी पदभरतीच्या निर्बंधातून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आलेला आहे. विभागाचा सुधारीत आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु असून त्यानंतर अनुरेखकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. गट-ड मधील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनाच्या प्रचलित नियमांतील तरतुदीनुसार करण्यात येईल.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### लोणार तालुक्यातील (जि.बुलडाणा) मुली शिक्षणापासून वंचीत राहत असल्याबाबत

**(८) ६९३०३ (१७-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार तालुक्यातील (जि.बुलडाणा) किन्ही, वायफळ व बिबखेड या किनगावजट्ट मार्गावरील तिन्ही गावातील सुमारे १०० ते १५० मुली लोणार येथे शिक्षणासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुलींना किनगावजट्टकडून सकाळच्या येणारी बसफेरी ही प्रवाशांनी भरुन येत असल्याने तिन्ही ठिकाणी न थांबता निघुन जाते परिणामी या मुलींना वेळेवर शाळेत पोहचणे शक्य होत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन येथे परिवहन महामंडळ किंवा शिक्षण विभागाची मानव विकास योजनेची बसफेरी चालु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०६-२०१७) :**(१), (२) व (३) किन्ही, वायफळ व बिबखेड येथुन अहिल्याबाई योजनेअंतर्गत एकूण ४५ पासधारी विद्यार्थिनी तसेच वायफळ व बिबखेड येथुन १५ शालेय पासधारी विद्यार्थिनी अशा एकूण ६० मुली दररोज लोणार येथे शिक्षणासाठी येत आहेत.

किन्ही, वायफळ व बिबखेड येथुन विद्यार्थी/ प्रवासी यांच्या सोयीकरीता दैनंदिन १४ फे-या उपलब्ध आहेत तसेच दिनांक २३.०९.२०१६ पासुन लोणार-किन्ही या मार्गावर नव्याने २ फे-या सुरु करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चालक-वाहकांना एक दिवस पूर्ण विश्रांती देण्याचे निदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(९) ७०४८१ (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाचे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी यांनी प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये या हेतूने चालक-वाहकांना एक दिवस पूर्ण विश्रांती देण्याचे निदेश आगार व्यवस्थापक आणि वाहतूक पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांना दिल्याने माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निदेशानुसार त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०६-२०१७) :**(१) व (२) प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये या हेतूने मोटार वाहतूक कामगार कायदयातंर्गत चालक-वाहकांना आठवडा सुट्टी म्हणून एक दिवस पुर्ण विश्रांती देण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाने दि.१७.१०.२०१६ च्या परिपत्रकान्वये निदेश दिले असून, सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत सर्व खातेप्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक, कार्यशाळा व्यवस्थापक, विभाग नियंत्रक, आगार व्यवस्थापक व विभागीय कार्यालयातील सर्व अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्हयातील जिल्हा माती परिक्षण कार्यालयात बिअरबार कम जुगाराचा अड्डा सुरु असल्याबाबत

**(१०) ७०७२९ (१६-१२-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वात सुपीक व उपजाऊ जमीन असलेला जिल्हा म्हणून सातारा जिल्हयाची ओळख असून या जिल्हयातील जिल्हा माती परिक्षण कार्यालयात बिअरबार कम जुगाराचा अड्डा सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कार्यालयात शेतकऱ्यांसह शासनाला फसविण्याचे काम सुरु असून विरोध करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेठीस धरणे, त्यांच्या तक्रारी करणे व चुकीची माहिती वरिष्ठ कार्यालय व अधिकाऱ्यांना देऊन त्यांचा मानसिक छळ करण्याचा प्रकारही सुरु असल्याचे आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-०५-२०१७) :**(१) तशा आशयाची बातमी दि.०९ सप्टेंबर,२०१६ रोजीच्या "दैनिक पुण्यनगरी" या वृत्तपत्रात छापून आलेली होती, हे खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) या प्रकरणी केलेल्या चौकशीत आढळून आले की, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, सातारा यांच्या कार्यालयातील अनुरेखक श्री.डी.एस.जगताप व कृषी सहाय्यक श्री.सचिन गुरव यांनी सन २०११-१२ पासून सन २०१४-१५ पर्यंत रू.१५,९८,७१७/- इतक्या रकमेचा संगनमताने अपहार केलेला आहे. सदर अपहार उघडकीस येऊ नये म्हणून त्यांनी कार्यालयातील दस्तऐवज गहाळ करणे, कार्यालय प्रमुखांना जाणीवपूर्वक त्रास देणे, त्यांच्याविरूध्द तक्रारी करणे, दैनंदिन कामकाजात अडथळे आणणे, अशा प्रकारची गैरकृत्ये

केलेली आहेत. त्यानुषंगाने सातारा तालुका पोलीस ठाणे येथे गु.नों क्र. ३४५/२०१६, भा.दं.वि कलम ४०९, ४२०, ५०६, ३४ अन्वये दिनांक १०.०९.२०१६ रोजी दोघांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(११) ७४०२५ (१३-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यात पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांची ६ पदे मंजूर असून केवळ २ पदे कार्यरत आहेत, तसेच सहआयुक्त पशुसंवर्धन हे पद ही रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पन्हाळा तालुक्यातील १ लाख ८ हजार ९०८ पशुधनांचा भार केवळ २ पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांवर असून वेळेवर उपचार होत नसल्यामुळे अनेक प्राण्यांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार शासनाने पन्हाळा तालुक्यातील पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. महादेव जानकर (१६-०६-२०१७) :**(१) होय, खरे आहे.
पन्हाळा तालूक्यात पशुधन विकास अधिकारी यांची ७ पदे मंजूर असून सद्यस्थितीत ६ पदे रिक्त आहेत. तसेच तालपसचि,काडोली येथील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे पद भरलेले आहे.
(२) हे खरे नाही.
रिक्त असलेल्या पदाचा कार्यभार नजीकच्या दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून,पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने उपचाराअभावी जनावरांची मर्तुक झालेली नाही व अशा प्रकारची कुठलीही तक्रार पशुपालकांना प्राप्त झालेली नाही.
(३) रिक्त असलेल्या पदाचा कार्यभार नजीकच्या दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमित पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) पशुसंवर्धन विभागात रिक्त असलेली गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गाचे १०० रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दि.२६.०४.२०१७ रोजी जाहीरात प्रसिध्द केली असून याबाबत आयोगाने दि.२४.०६.२०१७ रोजी लेखी परिक्षा आयोजित केली आहे.

पशुधन विकास अधिकारी गट-ब संवर्गाची पदे पदोन्नतीने भरणेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### उरण (जि.रायगड) येथील करंजा बंदाराचे काम पूर्ण होण्याबाबत

**(१२) ७४०५९ (१३-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य सरकारने उरण (जि.रायगड) येथील करंजा बंदराकरिता १५४ कोटी रुपये देण्याची तयारी दर्शविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करंजा बंदाराच्या कामास केव्हापासून सुरुवात करण्यात येणार व केव्हापर्यत पूर्ण होणे शासनास अपेक्षित आहे,
(३) तसेच शासनाने करंजा बंदाराचे काम पूर्ण होण्यासाठी अद्यापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०८-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र.मत्स्यवि-१५१४/प्र.क्र.१७०/पदुम-१४, दिनांक १.१२.२०१६ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत केंद्र हिस्सा ५०%-५०% राज्य हिस्साचा योजनेअंतर्गत करंजा, जि.रायगड येथील मत्स्यबंदराचे बांधकामासाठी रु.१५३.९६ कोटी इतक्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक ३.१.२०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता पत्र पाठविण्यात आले आहे.
केंद्र शासनाकडून प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त होताच कामास सुरुवात करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष बागांचे होणारे नुकसान टाळण्याबाबत

**(१३) ७४३५० (१२-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष उत्पादक शेतक-यांच्या द्राक्ष बागांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी 'प्लास्टिक आच्छादन' या घटकांचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभागास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे काय, वा प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली नसल्यास, राज्य शासनांतर्गत पाठपुरावा करण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, पाठपुरावा न करण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२१-०६-२०१७) :**(१) होय.
(२) प्रस्तावास केंद्र शासनाने अद्याप मंजुरी दिलेली नाही. याबाबत शासन तसेच महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांच्या स्तरावरुन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नव्याने पशुपालन व्यवसायात येणा-या सर्वसाधारण घटकांसाठी आखण्यात आलेली योजना मान्यतेअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१४) ७५७३४ (१३-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नव्याने पशुपालन व्यवसायात येणाऱ्या सर्वसाधारण घटकांसाठी आखण्यात आलेली सुमारे ३०० कोटी रुपयांची प्रभावी योजना गेले अनेक दिवस मान्यतेअभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पशुधन विकास अधिकारी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत

**(१५) ७६०५० (१३-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पशुधन विकास अधिकारी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत पशुचिकित्सक व्यवसायी संघटनेनी विद्यमान मा.पशुसंवर्धन मंत्री यांची आठ वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन ३७ निवेदने देऊनही त्याची दखल घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संघटनेच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, पशुचिकित्सा व्यवसायी संघटनेच्या मगण्यांच्या संदर्भात मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पशुसंवर्धन मंत्री यांना पत्र पाठवून संघटनेच्या मागण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०६-२०१७) :**(१) पशुचिकित्सक व्यवसायी संघटना यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात शासनास वेळोवेळी निवेदने दिली आहेत.
(२) सदर निवेदनाव्दारे संघटनेमार्फत प्रामुख्याने सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट-क या संवर्गातून पशुधन विकास अधिकारी गट-ब या संवर्गात पदोन्नती देण्यात यावी, राज्यातील पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे भरण्यात यावी तसेच पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांना ग्रामसेवक, कृषी सहाय्यकाच्या धर्तीवर कायम प्रवास भत्ता मंजूर करावा ई. मागण्या केल्या आहेत.
(३), (४) व (५) सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट-क या संवर्गातून पशुधन विकास अधिकारी, गट-ब या संवर्गात पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे. त्याच प्रमाणे पशुसंवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक गट-क मधील रिक्त पदे नियमानुसार भरणेबाबतची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन यांचे स्तरावर सुरू आहे. संघटनेने मागणी केल्यानुसार कायम प्रवास भत्ता मंजूर करण्याची बाब धोरणात्मक असून वित्त विभागाच्या सहमतीने त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## बोईसर ग्रामीण भागात (ता.जि.पालघर) एस.टी. महामंडळाकडून बांधण्यात आलेले बस प्रतिक्षा निवारे नादुरस्त झाल्याबाबत

**(१६) ७८३५२ (१३-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर ग्रामीण भागात (ता.जि.पालघर) एस.टी. महामंडळाकडून प्रवाशाच्या सोईकरिता बस प्रतिक्षेकरीता मुख्य रस्त्यालगत मोठे निवारे बांधण्यात आले होते मात्र ते निवारे नादुरुस्त झाले असून निवा-यामध्ये मोठा कचरा साचून गुराढोरांचा मोठया प्रमाणात ये-जा होत असल्यामुळे लोकांना एस.टी. बस पकडण्यासाठी उन्हात उभे राहावे लागत असून दुर्गंधींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवासी निवारे स्वच्छ करुन त्यांची योग्य वेळी डागडुजी करण्यासाठी स्थानिक लोकांनी परिवहन महामंडळ बोईसर तसेच परिवहन महामंडळ, मुंबई यांच्याकडे सन २००२ पासून लेखी निवेदने तसेच मौखीक विनंत्या करुनही सदर महामंडळ लक्ष देत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली,
(४) तसेच प्रवासी निवारे, स्वच्छ व दुरुस्ती करुन प्रवाशांना उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) बोईसर (ता.जि.पालघर) या ग्रामीण भागातील चिंचणी येथील मार्ग निवारा वगळता अन्य मार्ग निवारे सुस्थितीत आहेत. सन २००२ मध्ये दांडी ग्रामपंचायत वगळता अन्य कोणीही मार्ग निवाऱ्यांसाठी निवेदन दिलेले नाही. नादुरुस्त असलेल्या प्रवाशी निवाऱ्यांची पुनर्बांधणी राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे. राज्य परिवहन महामंडळातर्फे बांधण्यात आलेल्या प्रवाशी मार्ग निवाऱ्यांची स्वच्छता ही स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा नसल्याबाबत**

**(१७) ७८३६८ (१३-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून अपघातांमध्ये जखमी झालेल्या किंवा मरण पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना अपघात विम्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदतनिधी दिला जातो परंतु याच मंडळाच्या अनेक बसेसमध्ये आजही आग प्रतिबंधक यंत्रणा नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसटी बसने दररोज लाखो प्रवाशी ये-जा करतात यामध्ये ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला व लहान मुलांचा सर्वाधिक समावेश असूनही अद्यापपर्यंत एसटी बसेसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा न बसविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास यासंर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तद्नुसार राज्यातील सर्व एसटी बसेसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१७) :**(१) नाही.
(२), (३) व (४) राज्य परिवहन बसेसमध्ये शासनाच्या नियमानुसार आग प्रतिबंधक उपकरण ठेवण्यात येते. सदर उपकरणांची तपासणी प्रादेशिक परिवहन विभागाद्वारे दरवर्षी करुन घेतली

जाते. त्याचप्रमाणे अग्नीशमन उपकरणांचा पुरवठा सतत व्यवस्थित राहण्यासाठी महामंडळाद्वारे मे.युनिव्हर्सल फायर व मे.रोनक फायर एन्टरप्रायझेस यांचे बरोबर वार्षिक दर करार करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ऊस वाहतूक करणाऱ्या बैल गाडीत आवाक्यापेक्षा जास्त ऊस भरुन वाहतूक करण्यात येत असल्याबाबत**

**(१८) ७८४७० (१३-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ऊस वाहतूक करणाऱ्या बैल गाडीत आवाक्यापेक्षा जास्त ऊस भरुन दररोज वाहतूक करीत असल्याने कारखान्यांच्या नियमांप्रमाणे बैलांना पेलेल एवढी ऊस वाहतूक करण्याची मागणी शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्राणीमित्रांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार शासनाने मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३१-०५-२०१७) :**(१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालक्यात ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाडीत आवाक्यापेक्षा जास्त ऊस भरून वाहतूक करीत असल्याबाबतची कोणतीही तक्रार पशुसवंर्धन विभागाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, या संदर्भात सन २०१२ मध्ये साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीवरून साखर कारखान्यांवर ऊस वाहतूक करणाऱ्या बैलांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध घालण्यासंदर्भात साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.३१.१०.२०१२ च्या परिपत्रकान्वये आदेश निर्गमित केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) पशुखाद्याच्या दरवाढीमुळे दुग्ध व्यवसाय बंद होत असल्याबाबत**

**(१९) ७८४९३ (१२-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) मोठया प्रमाणात दुधाचे उत्पादन घेतले जाते, तथापि, सध्या पशुखाद्याचे दरवाढीमुळे दुग्ध व्यावसायिक आपले व्यवसाय बंद करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुखाद्यांच्या दरवाढीमागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, दुग्धव्यवसाय वाचविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०६-२०१७) :**(१) पशुखाद्याच्या दरात वाढ झाल्याचे निदर्शनास येत असले तरीही दुग्ध व्यवसायिक त्यांचा व्यवसाय बंद करीत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) पशुखाद्याच्या कच्च्या मालाच्या दरात झालेली वाढ, इंधन दरवाढीमुळे वाहतुक खर्चातील वाढ, उपकरणांचे सुटे भाग, विजेचे दर यामध्ये झालेली वाढ ही पशुखाद्य दरवाढीची कारणे आहेत.
(३) राज्यातील पशुधनापासुन दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी गायी-म्हशींमध्ये कृत्रीम रेतन, विविध रोगप्रतिबंधक लसीकरण, जंतनाशके पाजणे, खनिज मिश्रणाचा पुरवठा करणे, व्यंध्यत्व तपासणी, गोचीड निर्मुलन, रोगनिदान, औषधोपचार, बेरड वळूंचे खच्चीकरण इत्यादी सेवा पशुसंवर्धन विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत विद्युतचलित कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप, मूरघास बनविण्याचे युनिट स्थापन करणे, राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ०६/०४/०२ दुधाळ जनावरांचे वाटप, अनुवांशिक सुधारणा कार्यक्रम, आणि जिल्हास्तरीय योजनेंतर्गत ०२ दुधाळ जनावरांचे गट व खाद्य अनुदान वाटप, कामधेनू दत्तक ग्राम योजना आणि शेतकऱ्याच्या क्षेत्रावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन या विविध योजना पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. तसेच, कृषि विभागामार्फत राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम आणि हायड्रोपोनिक पध्दतीने चारा उत्पादन या योजना देखील राज्यात राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यात विशेष घटक योजनेचे अनुदान वाढविण्याबाबत

**(२०) ७८५३१ (१४-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यात विशेष घटक योजनेतंर्गत शेतकऱ्यांना शेतीसंबंधी बाबी पुरविण्यासाठी १०० टक्के अनुदान दिले जाते, परंतु सद्यस्थितीत महागाईमुळे शेतीसंबंधी साहित्याचा व इतर वस्तूंच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाल्याने १०० टक्के अनुदान हे प्रत्यक्षात ५० टक्केही मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे ५० हजारांच्या मर्यादेत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेताना स्वत:जवळचे लाखो रुपये खर्च करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणामुळे राज्य शासनाची ही योजना मागास व गरीब शेतकऱ्यांना पुन्हा कर्जातच लोटणारी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन सदरील योजनेचे अनुदान वाढविण्याबाबत व शेतकऱ्यांना त्याचा योग्य लाभ मिळण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-०६-२०१७)** :(१), (२), (३) व (४) येथील सर्व बाबींचा घावटे समितीकडून अभ्यास करुन दिनांक ५ जानेवारी,२०१७ च्या शासन निर्णयान्वये, अनुसूचित जाती/नवबौध्द शेकऱ्यांसाठी राबविण्यात येणारी विशेष घटक योजना सुधारित करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या नावाने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सुधारित योजनेमध्ये अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी मत्स्य विभागाकडे गस्तीसाठी केवळ एकच नौका उपलब्ध असल्याबाबत

**(२१) ७८९४८ (१३-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यास एकुण १६७ कि.मी. समुद्रकिनारा लाभला असुन रत्नागिरी जिल्ह्याच्या मत्स्य विभागाकडे समुद्रातील गस्तीसाठी केवळ एकच नौका उपलब्ध असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदशर्नास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षेच्या द्रुष्टीकोणातुन रत्नागिरी जिल्ह्यातील मत्स्य विभागास गस्तीसाठी आवश्यक असलेल्या नौका व कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०८-०६-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) राज्याच्या ७ सागरी जिल्हयासाठी मुंबई व मुंबई उपनगर-१, ठाणे व पालघर १, रायगड-१, रत्नागिरी-१ व सिंधुदूर्ग-१ अशा प्रकारे ५ गतीमान गस्ती नौका भाडयाने घेण्यात आलेल्या आहेत. सदर नौकेवर ठेकेदाराने कर्मचारी वर्ग (तांडेल व खलाशी) नियुक्त केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### येवला व निफाड (जि.नाशिक) मधील श्रेणी २ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची श्रेणी १ मध्ये दर्जा वाढ करण्याच्या मागणीबाबत

**(२२) ७८९८५ (१३-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला व निफाड (जि.नाशिक) मधील श्रेणी २ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा श्रेणी १ मध्ये दर्जा वाढ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे आक्टोंबर, २०१५ व माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०६-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) नाशिक जिल्हयातील ७१ श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणेस्तव आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये वित्त विभागास सादर केला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ बस डेपो मधील भंगार बसेसमुळे प्रवाश्यांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२३) ७९१४४ (१३-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयामध्ये दळणवळणासाठी एस.टी.बस व्यतरीक्त दुसरी कुठलीही सुविधा नसून एस.टी. बसच्या जिल्हा फेरीसह आंतरराज्य फेऱ्या होतात परंतु भंगार बसेस कधी कधी रस्त्यामध्ये बंद पडतात व प्रवाश्यांचे गैरसोय होत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार यवतमाळ येथील बसडेपो मध्ये नविन बसेस चा पुरवठा करण्यात येणार काय, असल्यास कधी पर्यंत करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलबांचे कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) सद्यस्थितीत यवतमाळ विभागातून ४६५ नियते चालविली जातात, यासाठी ५०३ वाहने उपलब्ध आहेत. सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये यवतमाळ विभागास ८३ नवीन बसेस देण्यात आल्या असून, यामध्ये १७ नवीन बसेस यवतमाळ आगारास देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये यवतमाळ विभागातून ६२ वाहने मोडीत काढली आहेत. यामध्ये यवतमाळ आगारातील १२ वाहने मोडीत काढली आहेत. यवतमाळ विभागातील बसेसचे सरासरी आयुर्मान ५.०८ वर्षे इतके आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माण (जि.सातारा) तालुक्यातील पांढरवाडी, कोळेवाडी, गोडसेवाडी व दिवडी या चार गावांमध्ये लावण्यात आलेली वृक्ष तोडल्याबाबत**

**(२४) ७९८७५ (१९-०४-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण तालुक्यातील (जि.सातारा) पांढरवाडी, कोळेवाडी, गोडसेवाडी व दिवडी या चार गावांमध्ये अभिनेता तसेच सामाजिक कार्यकर्ते सयाजी शिंदे व ग्रामस्थांमार्फत लावण्यात आलेली ५० वृक्ष दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास काही अज्ञात व्यक्तीने तोडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वृक्षाची तोड केल्याप्रकरणी तेथील ग्रामस्थांनी वन विभाग, सातारा तसेच पोलीस ठाणे, माण या ठिकाणी त्याच सुमारास तक्रारी केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

दिनांक १.७.२०१६ रोजी श्री.सयाजी शिंदे मित्र मंडळ व लोकसहभागातून एकूण १५००० रोपांची लागवड केली आहे. त्यापैकी मौजे पांढरवाडी येथील पांढरवाडी बसस्थानक ते प्राथमिक शाळा या जिल्हापरिषद ग्रामीण मार्गावरील ९४ रोपांपैकी ५२ रोपे दिनांक १७.१.२०१७ रोजी श्री.छगन आप्पा मदने या इसमाने तोड केल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) मौजे पांढरवाडी बस स्थानक ते प्राथमिक शाळा या जिल्हापरिषद ग्रामीण मार्ग क्रमांक ६२ च्या दुतर्फा लावणेत आलेल्या ९४ रोपांपैकी ५२ रोपे दिनांक १७.१.२०१७ रोजी श्री.छगन आप्पा मदने या इसमाने बुंदयाजवळ कुऱ्हाडीने तोडून नुकसान केलेले आहे. संबंधित ग्रामसेवक पांढरवाडी श्री.लक्ष्मण आण्णा वाघमोडे यांनी दहिवडी पोलीस स्टेशन मध्ये दिनांक १७.१.२०१७ रोजी तक्रार दाखल केलेली असून आरोपीस पोलीसांनी अटक करुन न्यायालयासमोर हजर केले नंतर त्यास न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. सदर गुन्हयातील आरोपीच्या विरुध्द दोषारोप पत्र पाठविण्या इतपत पुरावा गोळा झाल्याने दोषारोप पत्र पाठविण्याची मंजूरी मिळणेकामी गुन्हयाची कागदपत्रे उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग यांचेकडे पाठविण्यात आली आहेत.

तथापि, झालेल्या रोपांचे नुकसान भरुन काढणेसाठी वनविभागाने सदर संस्थेस दीड मीटर उंचीची वड, पिंपळ व सिंदी प्रजातीची ६० रोपे पुरवठा केली असून दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी त्या जागेवर लागवड केलेली आहे. पुन:श्च असा प्रकार होऊ नये याबाबत स्थानिक वनकर्मचारी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करीत आहे.

### बुलढाणा जिल्ह्यातील दुग्ध संस्था बंद पडत असल्याबाबत

**(२५) ७९९८३ (१२-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील दुष्काळामुळे जनावरे विकल्याने शेतक-यांना जगविण्याची ताकद असलेल्या दुध व्यवसायाला अवकळा आली असून येथील ३८ दुध संस्था बंद तर ५०० दुध उत्पादक संस्था अवसानात निघाल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन बुलढाणा जिल्ह्यातील दुध व्यवसायाला उभारी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३१-०५-२०१७) :**(१) होय.

बुलढाणा जिल्हयात एकूण ५८० नोंदणीकृत दुग्ध संस्था असून ५०८ संस्था अवसायनात आहेत. अवसायनातील संस्थांपैकी १० वर्षावरील २२४ संस्था असून उर्वरित १० वर्षाचे आतील २८४ संस्था आहेत. तसेच ७२ संस्था कार्यरत असून त्यापैकी ४२ संस्थांनी संघास/खाजगी प्रकल्पास दूध पुरवठा केलेला आहे. ३० संस्था बंद असून ५ नवीन संस्था नोंदविल्या आहेत.

(२) बंद असलेल्या संस्थांवर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांचेकडून सहकार कायद्यांतर्गत अवसायनात घेणे व नोंदणी रद्द करणेची कारवाई करण्यात येत आहे.

(३) बुलढाणा जिल्हयातील शासकीय दूध शितकरण केंद्र चिखली माहे सप्टेंबर, २०१६ पासून दूध हाताळणी सुरु करण्यात आलेली आहे. संघामार्फत चिखली-लोणार मार्ग व खामगाव-चिखली मार्गावरील संस्थांचा दूध पुरवठा चिखली केंद्रावर करण्यात आलेला आहे. तसेच सदर कालावधीमध्ये ५ नवीन प्राथमिक सहकारी दूध संस्थांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यातील मोहगाव येथील कोल्हापूरी बंधाऱ्याबाबत

**(२६) ८०१७१ (१७-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यातील मोहगाव बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

कुरखेडा (जि.गडचिरोली) तालुक्यातील मोहगांव बंधाऱ्यांचे काम सन २०१५ मध्ये पूर्ण झाले असुन त्याचे गुणवत्तेबाबत कुठलीही तक्रार कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, चंद्रपूर यांच्या कार्यालयात आढळून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्नाटक राज्याने बंदी घातलेल्या कर्नाटक मिल्क फेडरेशनचे "नंदीनी" या ब्रँडच्या दूधास राज्यात विक्री करण्याची परवानगी दिल्याबाबत**

**(२७) ८०७७३ (१२-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक राज्याने बंदी घातलेल्या कर्नाटक मिल्क फेडरेशनचे "नंदीनी" या ब्रँडच्या दूध कंपनीचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात उद्घाटन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटक राज्याने बंदी घातलेल्या दूधाची विक्री करण्यास परवानगी देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. महादेव जानकर (२९-०५-२०१७) :**(१) कर्नाटक मिल्क फेडरेशनचे “नंदीनी ” या ब्रँडचे दूध हे आक्टोबर,२०१६ मध्ये मुंबई येथे विक्रीस उपलब्ध केले आहे हे खरे आहे. मात्र सदर दुधावर कर्नाटक राज्याने बंदी घातलेली नाही.

(२) व (३) केंद्र शासनाने सन १९९१ पासून स्विकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणामुळे देशातील कोणतेही दुग्ध प्रकल्प देशातील कोणत्याही भागात दूध विक्री करु शकतात. त्यामुळे शासनाने सदर दूध विक्री करण्यास परवानगी देण्याचा प्रश्न उदभवत नाही.

---

**मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत अपुर्णावस्थेत असलेल्या शेततळ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२८) ८०८१४ (२०-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत ५५ हजार ७१४ शेततळयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली असुन त्यापैकी केवळ ९,६०६ शेततळयाचे काम प्रत्यक्षात पुर्ण झाले असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुर्णावस्थेतील शेततळयांची कामे पुर्ण होत नसल्याने शेतकऱ्यांची पाण्या अभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुर्ण शेततळ्यांची कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही. शेततळी मुख्यत्वे भुजल पुनर्भरणासाठी असून पावसाळयात भू-पृष्ठावरून वाहून जाणारे पावसाचे पाणी काही कालावधीसाठी अडविणे व जमिनीत मुरविणे यासाठी घेतली जातात.
(३) व (४) शेततळयांची कामेअधिक गतीने व्हावीत यासाठी शेततळे खोदकाम करणाऱ्या मशिनधारकास इंधन खर्चासाठी आगाऊ रक्कम म्हणून काम सुरु करण्यापुर्वी अनुज्ञेय अनुदानाच्या २० टक्के रक्कम लाभार्थीच्या खात्यावर जमा करण्याबाबतच्या तसेच मशिन धारकास केलेल्या कामाचा मोबदला मिळण्याची हमी व्हावी म्हणून मशिनधारक, लाभार्थी व कृषि विभागाच्या प्रतिनिधी यांचे मध्ये १०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर करार करण्याच्या सूचना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आल्या आहेत. शासन स्तरावरून शेततळयांच्या कामाचा आढावा घेण्यात येत आहे. सद्य:स्थितीत “मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत ९४,१६८ शेततळयांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला असून २८,१४६ इतकी कामे पूर्ण झाली आहेत. तसेच १०,०८६ इतकी कामे सुरू आहेत.

---

## राज्यातील शैक्षणित गुणवत्ता व आवश्यक चांगल्या सोयी सुविधा नसलेल्या खासगी कृषी महाविदयालयांची मान्यता रदद करण्याबाबत

**(२९) *८१२६८* (१४-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शैक्षणित गुणवत्ता व आवश्यक चांगल्या सोयी सुविधा नसलेल्या खासगी कृषी महाविदयालयांची मान्यता रदद करण्याचा निर्णय महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने घेतला असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही महिन्यापूर्वी भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या अधिस्वीकृती मंडळाने केलेल्या पाहणीमध्ये अनेक खासगी महाविद्यांलयामधील सोयी सुविधा तसेच शैक्षणिक गुणवत्ता अपुरी असल्याचे निदर्शनास आले होते या कारणास्तव मंडळाने राज्यातील चारही कृषी विदयापीठांची अधिस्वीकृती स्थगित ठेवली होती तद्नंतर शासनाने केलेल्या आवश्यक कार्यवाही नंतर या कृषी विदयापीठांना दोन वर्षासाठी अधिस्विकृती देण्यात आली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील चारही कृषी विदयापीठांची गुणवत्ता कायमस्वरुपी सुधारण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०६-२०१७)** :(१) नाही.

(२) सर्व कृषि विद्यापीठांमध्ये मोठया प्रमाणात रिक्त जागा व कृषी विद्यापीठांतर्गत मोठया प्रमाणात सुरु असलेली खाजगी महाविद्यालये त्यामुळे ढासळलेला शैक्षणिक दर्जा यामुळे भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने चारही कृषि विद्यापीठांच्या अधिस्वीकृतीला स्थगिती दिली होती.

कृषि विद्यापीठांनी या प्रकरणी केलेल्या/करीत असलेल्या उपाययोजनांचा अहवाल भारतीय कृषी अनुसंधान परिषदेस कळविल्यानंतर भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने कृषी विद्यापीठांचे मानांकन दोन वर्षासाठी मुक्त केले आहे.

(३) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व राज्यातील चारही कृषि विद्यापीठे यांच्यास्तरावरुन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या पशुसंवर्धन विभागात २२०० पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) ८१५३१ (१३-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुधनाच्या व पशुपालकांच्या विकासाची जबाबदारी असलेल्या पशुसंवर्धन विभागात २ हजार २०० पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०३-०६-२०१७)** :(१) पशुसंवर्धन विभागात सद्यस्थितीत गट-अ संवर्गात ३७६, गट-ब संवर्गात २५४, गट-क संवर्गात ६८९ व गट-ड संवर्गात ८८० अशी एकूण २१९९ पदे रिक्त आहेत.

(२) पशुसंवर्धन विभागातील गट-अ संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गात सद्यस्थितीत रिक्त असलेल्या १९१ पदांपैकी १०० रिक्त पदे भरण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली असून त्यानुसार या संवर्गाची १०० पदे सरळसेवेने भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२६.०४.२०१७ रोजी जाहीरात प्रसिध्द केली आहे. त्याच प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (गट-ब) या संवर्गात रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरणेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यस्तरावरील गट-क मधील पशुधन पर्यवेक्षकांना सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट-क या पदावर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही तसेच गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबत आयुक्त पशुसंवर्धन यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

पशुसंवर्धन विभागातील राज्यस्तरीय गट-ड संवर्गातील २६९ रिक्त पदे भरण्याकरीता गुणवतेनुसार उमेदवारांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती आदेश देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एस.टी. महामंडळात एस.टी चालक वाहकाकडून अवैधरित्या दंडाची वसूली होत असल्याबाबत**

**(३१) ८१५७३ (१३-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी. महामंडळाच्या कामकाजात शिस्तीच्या नावाखाली एस.टी चालक व वाहक यांच्याकडून दंड आकारणीच्या नावाखाली १०० ते ५०० रुपये पर्यंतची आर्थिक वसूली सक्षम अधिकाऱ्यांकडून केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षेच्या दंडाच्या रकमेच्या वसुलीबाबत कोणत्याही प्रकारचे लेखा परीक्षण केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर रक्कम हि कामगारांच्या मासिक पगारातून कपात केली जात असल्याने कर्मचारी (चालक व वाहक) वर्ग मानसिक दबावाखाली काम करत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सक्षम प्राधिकरणाद्वारे शासनाने चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून त्यानुसार अवैधरित्या दंडाची वसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०६-२०१७) :**(१) नाही.

(२) सक्षम प्राधिकारी यांचेकडून "शिस्त व आवेदन कार्यपध्दती" अन्वये कसूरदारास केलेल्या दंडाच्या आकारणीबाबत लेखा खात्याकडून मुल्यमापन अथवा लेखा परिक्षण केले जात नाही. तथापि, केलेल्या दंडाविरुध्द कसूरदारास संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे अपिल करण्याची संधी दिली जाते व सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार दंडाची रक्कम लेखा खात्यामार्फत वेतनातून वसूली केली जाते.

(३) नाही.

(४) दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी महामंडळाकडे ठाणे-१ आगारातील कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत असलेल्या दंड वसुलीबाबतची निनावी तक्रार प्राप्त झाली. उक्त तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन महामंडळाद्वारे चौकशी केली असता, ठाणे-१ आगारात करण्यात आलेली अपराध कार्यवाही ही अपराधाचे स्वरुप पाहून शिस्त व आवेदन कार्यपध्दतीतील तरतूदीनुसार करण्यात आली असल्याचे आढळून आले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील पशुचिकित्सालय इमारतीची झालेली दुरावस्था**

**(३२) ८१६५६ (१३-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील पशुचिकित्सालय इमारतीची दुरावस्था होऊन सदर इमारत धोकादायक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुचिकित्सालय इमारतीचा बांधकाम निधी मंजुर असुनही गत ३ वर्षापासुन प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्यामुळे इमारतीचे बांधकाम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०६-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) सदर पशुचिकित्सालयाच्या इमारतीचे नवीन बांधकाम करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने दि.२१.९.२०१६ अन्वये रू.२२०.५३ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करून सन २०१६-१७ मध्ये रू.५०.०० लक्ष निधी वितरीत केला आहे. तसेच सदर प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया राबवून दि.२४.३.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात दुधाळ जनावरांचे वाटप बोगस लाभार्थ्यांना केल्याबाबत**

**(३३) ८१७८४ (१३-०४-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात दुधाळ जनावरांचे वाटप बोगस लाभार्थ्यांना करण्यात आल्याचे माहे डिसेंबर २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.

(३) असल्यास, त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०६-०५-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे. एका व्यक्तीने बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुदानाचा लाभ घेतला होता. सदर बाब निदर्शनास आल्यावर नोटीस देऊन अनुदानाची वसूली करण्यात आलेली आहे.
(२) व (३) या प्रकरणातील संबंधित पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शेलगांव (वांगी), (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे केळी संशोधन केंद्र उभारण्याबाबत**

**(३४) ८२२६६ (१५-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शेलगांव (वांगी), (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे केळी संशोधन केंद्र उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.कृषीमंत्री यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केळी संशोधन केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०५-२०१७) :**(१) होय.
(२) महात्मा फुले कृषि विद्यापीठा अंतर्गत जळगांव येथे केळी संशोधन केंद्र कार्यरत असून सदर केंद्रातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्हयांसाठी संशोधन शिफारशी देण्यात येतात. सबब नवीन केळी संशोधन केंद्राची आवश्यकता वाटत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे.कोर्टी, केम, पांगरे, (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे पशुधन चिकित्सालय श्रेणीवाढ होणेबाबत**

**(३५) ८२२६८ (१३-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोर्टी, केम, पांगरे (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे पशुधन चिकित्सालय श्रेणीवाढ होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) राज्यातील विविध जिल्हयातील ७१ श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणेस्तव आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उदगीर (जि.लातूर) येथील पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठाचे उपकुलगुरु पद भरुन याठिकाणी उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(३६) ८२४२३ (१३-०४-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथील पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठाचे उपकुलगुरु पद भरुन याठिकाणी उपकेंद्र सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासन व विदयापीठ प्रशासनाने उदगीर येथे उपकुलगुरु पद व उपकेंद्रास मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उपकुलगुरु पद भरण्याबाबत व उपकेंद्र निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१२-०६-२०१७) :**(१) नाही.
(२), (३) व (४) उदगीर, जि.लातूर येथे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे उपकेंद्र कार्यरत आहेत.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मध्ये उपकुलगुरु पदाचा समावेश नाही. त्यामध्ये सदर पद मंजुर करणे व उदगीर येथील उपकेंद्रामध्ये सदर पद भरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### उदगीर (जि.लातूर) येथील पशुवैद्यकीय विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या निधीबाबत

**(३७) ८२४२४ (१३-०४-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथील पशु वैद्यकीय विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या मान्यतेनंतर उपकेंद्र उभारण्यासाठी आलेला निधी परत गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी परत जाण्याचे कारण काय,
(३) असल्यास, निधी परत उपलब्ध व्हावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करुनही निधी उपलब्ध करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पशुवैद्यकीय विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३०-०५-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) निधी परत गेलेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) निधी परत न गेल्याने निधीची मागणी केली नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर येथील बंद पडलेला शासकीय दुग्ध भुकटी प्रकल्पास सुरु करणेबाबत**

**(३८) ८२४२६ (१५-०४-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथील दुग्ध भुकटी प्रकल्पाची मशिनरी व इमारत नादुरुस्त असल्याने निधी अभावी हा प्रकल्प बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंद पडलेला दुग्ध भुकटी प्रकल्प सुरु करण्यात यावा यासाठी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उदगीर येथील दुग्ध भुकटी प्रकल्पे सुरु करण्यासाठी शासनाने निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उदगीर येथील दुग्ध भुकटी प्रकल्पाची मशिनरी व नादुरुस्त इमारत तसेच निधी अभावी बंद असलेला उक्त प्रकल्प तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०६-२०१७)** :(१) नाही. निधी अभावी सदर प्रकल्प बंद नसुन उदगीर जि.लातूर येथील दुग्ध भुकटी प्रकल्प ३८ वर्ष जुना असुन बॉयलर बंद पडल्याने व इमारत अत्यंत जिर्ण झाल्याने प्रकल्प बंद आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नाही.
(४) दूध भुकटी प्रकल्प सार्वजनिक व खाजगी सहभागाने पी.पी.पी. अंतर्गत पुर्नजीवित करावयाचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदूर बाजार (जि.अमरावती) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयमध्ये करण्याबाबत**

**(३९) ८२५९५ (१३-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर बाजार (जि.अमरावती) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय मध्ये करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे आयुक्त, पशुसंवर्धन यांनी दिनांक १८ मार्च २०१६ रोजी सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका स्तरावरील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ यांचे लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयात रुपांतर करण्याचा निर्णय राज्य शासनाने सन २०१० मध्येच घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चांदूर बाजार येथे लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) चांदूर बाजार येथे श्रेणी १ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे रुपांतर तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयामध्ये करण्यासाठी विविध संवर्गातील नवीन पदांची निर्मिती करणे आवश्यक आहे. पदनिर्मितीचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुय्यम मिश्र खतावर बंदी घालण्यात आलेल्या खताची श्रेणी (ग्रेड) बदलून नवी श्रेणी लागू करण्याबाबत**

**(४०) ८२६२२ (१४-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुय्यम मिश्र खत १०:५:१० (कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर) या खतावर बंदी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर खताची श्रेणी (ग्रेड) बदलून नवी श्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-०६-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) राज्य खत समितीच्या दि.१२.०१.२०१७ च्या बैठकीत सदर ग्रेड निराधुचित करण्याचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाकडून प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ढगाळ हवामानामुळे द्राक्षबागासह रब्बी पिकांवर रोगांचा झालेला प्रादूर्भाव**

**(४१) ८२७८८ (१२-०४-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात ढगाळ हवामानामुळे द्राक्षबागासह रब्बी पिकांवर रोगांचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत पाहणी केली आहे काय

(३) असल्यास, त्यानुषंगाने द्राक्षबागासह रब्बी पिकांवर होणारा रोगाचा प्रादूर्भाव रोखण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत व आखण्यात येत आहे,

(४) तसेच यामुळे नुकसाग्रस्त बागायतदरांना शासनाने कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२१-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक दुग्धशाळा प्रक्षेत्र उपवन प्रकल्पांतर्गत साईबाबा महिला दुग्ध व्यावसायिक सहकारी संस्था म.ताडगाव (ता.मोहाडी, जि.भंडारा) यांनी केलेल्या अनियमिततेबाबत**

**(४२) ८२८८१ (१२-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक दुग्धशाळा प्रक्षेत्र उपवन प्रकल्पांतर्गत साईबाबा महिला दुग्ध व्यावसायिक सहकारी संस्था म.ताडगाव, (ता.मोहाडी, जि.भंडारा) यांनी केलेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक २६ मे, २०१६ रोजी दिलेल्या चौकशीच्या पत्रावर विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), नागपूर प्रादुवीअ नागपूर यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त संस्थेची चौकशी करण्यासाठी तपासणी पथक स्थापन करून या पथकाने दिनांक १२ जुन, २०१५ रोजी पूर्वी अहवाल, अभिप्रायासह सादर करावयाचा होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) होय. याप्रकरणी सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध),भंडारा यांचेमार्फत सहकार कायदा ८३ अन्वये चौकशी करण्यात येत आहे. सदर प्रकरणी नियुक्त करण्यात आलेले प्राधिकृत चौकशी अधिका-यांच्या नियुक्ती २ वेळा बदल करावे लागले असल्याने चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर करण्यास विलंब झाला आहे. याप्रकरणी दि.०९/०५/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांची नव्याने चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याचे सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), महाराष्ट्र राज्य यांनी शासनास कळविले आहे.

---

## निफाड (जि.नाशिक) ताकुक्यातील नकली कीटकनाशके तयार करणाऱ्या डीपोंड कंपनीवर कारवाई करणेबाबत

**(४३) ८२९०८ (१४-०४-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील नकली कीटकनाशके तयार करणाऱ्या डीपोंड कंपनीचे नमुने फरीदाबाद येथे पाठविण्याबाबत शासनाने सुचित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनुसार नकली कीटकनाशके तयार करणाऱ्या डीपोंड कंपनीचे कीटकनाशके महाराष्ट्र राज्यातील प्रयोगशाळा सोडून फरीदाबाद येथे नमुने पाठविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर नुमान्याबाबत फरीदाबाद प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार नकली कीटकनाशके तयार करणाऱ्या डीपोंड कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०६-२०१७) :**(१) व (२) डीपोंड कंपनी उत्पादित बेनेव्हिया या कीटकनाशकाचा नमुना कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा ठाणे यांच्याकडून अप्रमाणित घोषीत करण्यात आल्यामुळे कंपनीने मा.न्यायालयात केलेल्या मागणीनुसार व मा.न्यायालयाचे

आदेशानुसार नमुना पुनर्तपासणीसाठी केंद्रिय कीटकनाशक प्रयोगशाळा फरिदाबाद येथे पाठविण्यात आला होता, हे खरे आहे. फरिदाबाद येथील केंद्रिय किटकनाशक प्रयोगशाळेकडे संदर्भ प्रयोगशाळा (Referal Laboratory) या उद्देशाने केवळ पुनर्तपासणीचे किटकनाशक नमुने पाठविले जातात.

(३) व (४) केंद्रिय कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा फरिदाबाद यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार नमुना प्रमाणित आढळून आलेला आहे. त्यामुळे डिपोंड कंपनीवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथे व्यावसायीक तत्वावर उतीसंवर्धनाव्दारे केळी रोपे निर्मिती केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(४४) ८३२७७ (१४-०४-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात सर्वात जास्त केळीचे पिक घेतले जाते, परंतु केळी रोपांची कमतरता व कंदापासून कमी उत्पन्न यामुळे उतीसंवर्धनाव्दारे केळी रोप निर्मिती करणे गरजेचे असल्यामुळे व्यावसायीक तत्वावर उतीसंवर्धनाव्दारे केळी रोप निर्मिती केंद्र स्थापन करण्याबाबत आवश्यक असलेल्या रुपये १,९६७.०८ लक्ष निधी आवश्यक असून सदरहू निधी मागणीचा महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीचा प्रस्ताव कृषि परिषदेमार्फत शासनास सन २०१५ साली सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रस्तावाबाबतचा निधी त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०५-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या दिनांक १०/०६/२०१६ च्या पत्रान्वये केळी संशोधन केंद्र, जळगांव येथे व्यावसायिक तत्वावर उती संवर्धन केळी रोपे निर्मिती केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाची शासनातर्फे वेळोवेळी छाननी करण्यात आली असून जळगांव ऐवजी कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर किंवा भालदे / हिंगोणा येथील कृषी विद्यापीठाच्या जागेवर अशा प्रकारचे केंद्र सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्या अनुषंगाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडून महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे मार्फत प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

---

**कोकण कृषी विद्यापीठ दापोली (जि.रत्नागिरी) येथील अस्थायी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४५) ८३३६४ (१४-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण कृषी विद्यापीठ दापोली (जि.रत्नागिरी) येथील अस्थायी कर्मचाऱ्यांनी ठेकेदारी पद्धत बंद व्हावी, समान वेतन कायदा लागू व्हावा, प्रथमोपचार सुविधा, अपघाती विमा आदी मागण्या विद्यापीठाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०६-२०१७) :**(१) होय.

(२) सदर मागण्या शासन स्तरावर प्राप्त झाल्या नसल्याने शासन स्तरावरुन कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तूर, सोयाबीन व मका या पिकासाठी शासनाने जाहिर केलेला हमीभाव अत्यल्प असल्याबाबत**

**(४६) ८३४६८ (१४-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सोयाबीन पिकासाठी रूपये २७७५, तूर पिकासाठी रूपये ५०५० व मका पिकासाठी रूपये १६६५ इतका हमीभाव जाहिर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पिकांचा उत्पादन खर्च हा दिला गेलेल्या हमी भावापेक्षा अधिक असल्याने शेतकरी वर्ग असंतुष्ट आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पिकांसाठीचा हमीभाव वाढविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.कृषि मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१६-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) केंद्र शासनाने विक्री हंगाम २०१६-१७ साठी सोयाबीन पिकासाठी रुपये २७७५/-, तूर पिकासाठी रुपये ५०५०/- व मका पिकासाठी रुपये १३६५/- इतका हमीभाव जाहिर केला आहे, हे खरे आहे.

सदरील पिकांसाठीचा हमीभाव वाढविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांना दिलेले दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजीचे निवेदन दि.०८/०३/२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे.

आणि त्याअनुषंगाने मा.लोकप्रतिनिधीना मा.मंत्री (कृषी) यांच्या स्वाक्षरीने दि.२३/०३/२०१७ रोजी माहिती कळविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या धाप्यातील गळतीमुळे पाण्याचा अपव्यय होत असल्याबाबत**

**(४७) ८३५२४ (१५-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अनेक ठिकाणी असलेल्या कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे धापे नादुरुस्त असल्यामुळे पाणीगळती होऊन पाण्याचा अपव्यय होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यांचे धापे दुरुस्त करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

छोटे पाटबंधारे विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत दौंड (जि.पुणे) तालुक्यातील स्थानिक ओढ्यावरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे धापे सुस्थितीत असून पाणी गळती होत नाही.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन छोटे पाटबंधारे विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे कार्यालयात आढळून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयात उपसा सिंचन योजना व कोल्हापुरी पॅटर्न बंधारा बांधकामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४८) ८३५६० (२०-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु सिंचन (जलसंधारण) विभाग चंद्रपुर, या विभागांतर्गत गडचिरोली जिल्हयात उपसा सिंचन योजना व कोल्हापुरी पॅटर्न बंधारा यासारख्या जल संधारणाच्या योजना कोट्यवधी रुपये खर्च करून मोठ्या प्रमाणात राबविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपसा सिंचन योजना व कोल्हापुरी पॅटर्न बंधारा यासारख्या जल संधारणाच्या योजनासाठी १६९१ हेक्टर जमीन सिंचित करण्यासाठी १६९६.०० लक्ष रुपये खर्च करुनही एकही प्रकल्प सुरु करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानंतरही ५५१ लक्ष रुपये, मंजूर करून ६७६ हेक्टर जमीन सिंचित करण्याकरिता निविदा काढल्या मात्र अजून पर्यंत कार्यारंभ आदेश झालेले नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपसा सिंचन योजने अंतर्गत कुंभी, रानमुल ता.गडचिरोली व पयडी,पेंढरी (ता.धानोरा, जि.गडचिरोली) या गावांतील १ कोटी ७० लक्षाहून अधिक रकमेच्या या योजना पूर्ण झालेल्या नसतानाही पूर्ण झाल्याचे दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच मुधोली (तुकूम), जयरामपूर, मोहुर्ली फराडा ता.चामोर्शी व सावरगाव कुरखेडा ता.गडचिरोली या गावांमधील १ कोटी ५० लक्षाहून अधिक रकमेच्या कोल्हापुरी पध्दतीच्या योजना कार्यारंभ आदेश होऊनही पूर्ण झालेल्या नाही, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर कामे पूर्ण न करताच पूर्ण बिलांची रक्कम उचलून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, हे खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०८-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, चंद्रपूर या विभागांतर्गत उपसा सिंचन योजना व कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा या योजनांना पाणी वापर संस्था स्थापन करण्याकरिता स्थानिक शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे योजना राबविण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

(२) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील विविध लेखाशिर्षांतर्गत २१ योजना पूर्ण झाल्या असून योजनांवर रुपये १४१४.०० लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. सदर योजनांची संकल्पीत सिंचन क्षमता १६२४ हेक्टर आहे. त्यापैकी प्रत्यक्ष सिंचन १४८ हेक्टर होत आहे. प्रगतीपथावरील १९ योजना असून या योजनांवर रुपये ४३४.४४ लक्ष निधी खर्च झाला आहे. या योजनांची संकल्पीत सिंचन क्षमता १४३० हेक्टर इतकी आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

निविदा प्रक्रियेतील ७ योजना असून त्यांची प्रशासकीय मान्यतेची किंमत रुपये ५५६.०० लक्ष इतकी आहे. त्यांची संकल्पीत सिंचन क्षमता २६३ हेक्टर इतकी आहे. यापैकी चिंतलपल्ली व चिंचेला, ता.सिरोंचा या दोन उपसा सिंचन योजनांची निविदा रद्द करण्याचे प्रस्तावित असून फेर निविदाची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

उपसा सिंचन योजनेंतर्गत (१) कुंभी, (२) रानमुल, ता.गडचिरोली, (३) पयडी, (४) पेंढरी, ता.धानोरा या चार योजना पूर्ण करुन चाचणी करण्यात आली आहे. त्यानंतर या योजनांस पाणी वापर संस्था स्थापन झाली नसल्यामुळे सदर योजना बंद अवस्थेत आहेत.

(५) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली तालुक्यातील (१) सावरगांव कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा व (२) कुरखेडा उपसा सिंचन योजना पूर्ण झालेल्या आहेत. चामोर्शी तालुक्यातील उपसा सिंचन योजनांतर्गत (१) मुधोळी (तुकुम), (२) जयरामपूर, (३) मोहर्ली (४)फराडा या योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(६) हे खरे नाही.

योजनांच्या झालेल्या कामाप्रमाणे त्याचे चालु देयकेनुसार भुगतान करण्यात आलेले आहे. योजनांचे अंतीम देयके देणे शिल्लक आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदर्श आमदार ग्राम योजनेंतर्गत साकुर्डी (ता.खेड) या गावामधे देशी गाईंचा पुरवठा करून सेंद्रिय दुध संकलन केंद्र सुरु करून पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत**

**(४९) ८३९१८ (१२-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श आमदार ग्राम योजनेंतर्गत साकुर्डी (ता.खेड) या गावामधे विशेष पथदर्शी प्रकल्प म्हणून गावामधे अनुसूचित जातीच्या महिला लाभार्थींना १००% अनुदानावर दुधाळ देशी गाईंचा पुरवठा करून सेंद्रिय दुध संकलन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०५ जानेवारी,२०१७ रोजी शासनास सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकल्पामुळे दुध संकलन, बायोगॅस तसेच दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती होऊन आदिवासी महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी बाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर पथदर्शी प्रकल्प राबवणेबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्ण पिकांचे नुकसान दाखवून जिल्हाधिकारी यांना खोटा अहवाल सादर केल्याबाबत**

**(५०) ८४०९० (१४-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील तालुका कृषि अधिकारी नेर, मंडळ कृषि अधिकारी नेर, मंडळ अधिकारी राजस्व नेर, तलाठी दगड धानोरा यांनी संयुक्त स्थळाचे निरिक्षण करुन पूर्ण पिकांचे नुकसान दाखवून जिल्हाधिकारी यांना तीन वेळा खोटा अहवाल सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) होय, खरीप २०१३ मध्ये मौजे दगड धानोरा येथील ३ शेतकऱ्यांनी नुकसानीच्या अहवालामध्ये त्यांचे नाव नसल्यामुळे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना तक्रार दिलेली होती. त्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली असून त्यामध्ये सदर शेतकऱ्यांचे ५० टक्केच्या आत नुकसान झाले असल्यामुळे त्यांची नावे नुकसानीच्या अहवालात समाविष्ट करण्यात आलेली नसल्याचे चौकशीत निष्पन्न झालेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

___________

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.